


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १७५ वा सोमवार | दि २५ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# काका-पुतण्या, भाऊ-भाऊ एकत्र येऊन निष्ठा महाराष्ट्राशी नसेल, तर काहीही उपयोग नाही...

**वृत्तसंस्था/मुंबई**

काका-पुतण्या, भाऊ-भाऊ एकत्र येऊन त्यांची निष्ठा महाराष्ट्राशी नसेल, तर काहीही उपयोग नाही. मराठीचे राजकारण ठाकरे, पवारांच्या पलीकडे गेले पाहिजे,फ अशी अपेक्षा मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांनी व्यक्त केली. मराठी अभ्यास केंद्र, महाराष्ट्र देशाभिमानी संघ आयोजित ङ्गम मराठीचा, म महाराष्ट्राचाफ या निर्धार परिषदेत डॉ. पवार बोलत होते. मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमित, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, शाहीर संभाजी भगत, प्रकाश परब, अर्थतज्ज्ञ प्रा. नीरज हातेकर या वेळी उपस्थित होते. डॉ. पवार म्हणाले, ङ्गत्रिभाषा धोरण जपण्याची केवळ महाराष्ट्राची जबाबदारी नाही. हिमालयाची काळजी करण्यापेक्षा आधी सह्याद्री आणि सातपुडा जपला पाहिजे. मराठीसाठीचा लढा हा जीवन-मरणाचा लढा आहे. ही संधी गमावल्यास महाराष्ट्राचे विभाजन किंवा त्रिभाजन होण्याचा धोका आहे. तमिळनाडूमध्ये द्रविड धर्माचे नाव घेऊन राजकारण केले, आपण मराठी, महाराष्ट्र धर्माचे राजकारण का करू शकत नाही.फङ्गमहाराष्ट्रातील अर्थव्यवस्था मराठी माणसांच्या हाती नाही. शहरे वाढताना मराठी माणूस त्यातून बाहेर पडत आहे. एक देश, एक, भाषा, एक संस्कृती हे उद्दिष्ट झाले आहे. हिंदीच्या सत्तीमागे राजकारण, सांस्कृतिक वर्चस्व आहे. त्या विरोधात मराठीचे, महाराष्ट्रकारणाचे कथन, अस्मिता निर्माण करावी लागणार आहे,फ असे प्रा. नीरज हातेकर यांनी सांगितले. ङ्गमराठीकरण ही मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीची सर्वसमावेशक चळवळ आहे. या निमित्ताने मराठी माणसांची एकजूट झाली. पहिलीपासून तिसरी भाषा किंवा हिंदी भाषा लागू करण्यास विरोध राहील. त्या पलीकडे मराठी भाषिक समाज म्हणून ओळख ठळक करण्याची गरज आहे,फ असे परब यांनी सांगितले. मराठीसाठी राजकारणाच्या पलीकडे जाऊन



एक व्हावे लागेल, असे आवाहन सर्वपक्षीय प्रवक्त्यांनी केले. कम्युनिस्ट नेते अजित अभ्यंकर, मनसेचे अनिल शिदोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) विकास लवांडे, ङ्गआपफचे मुकुंद कीर्दत, शिवसेना (उबाठा) सुषमा अंधारे, काँग्रेसचे हनुमंत पवार आदी उपस्थित होते. भाषा, ज्ञान, संस्कृती, देश या भिन्न गोष्टी आहेत. भाषा आणि देश वेगळे करता येत नाही. मराठी भाषा प्रगत आहे, ज्ञानाची भाषा आहे; पण ती संपन्न झालेली नाही. रस्त्यावरची भाषा हिंदी, ज्ञानाची भाषा इंग्रजी आहे. आपली भाषा सोडणे हा आत्मघात आहे,असे लक्ष्मीकांत देशमुख यांनी सांगितले. भाषा, ज्ञान, संस्कृती, देश या भिन्न गोष्टी आहेत. भाषा आणि देश वेगळे करता येत नाही. मराठी भाषा प्रगत आहे, ज्ञानाची भाषा आहे; पण ती संपन्न झालेली नाही. रस्त्यावरची भाषा हिंदी, ज्ञानाची भाषा इंग्रजी आहे. आपली भाषा सोडणे हा आत्मघात आहे,असे लक्ष्मीकांत देशमुख यांनी सांगितले.

# सतत वाहणाऱ्या रस्त्यावर जनसमूदाय जमवून कायद्याचे उल्लघन करणाऱ्यावर शहर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल

## मुंबई पोलीस कायद्याचे उल्लंघन प्रकरणी गुन्हा दाखल!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील चावडी चौक येथे एका खासगी कार्यक्रमाला कायद्याचा फज्जा उडविला आहे. पोलीसांनी स्पष्ट केलेल्या आदेशांना डावलत परवानगी शिवाय हा खासगी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामुळे सतत वाहणाऱ्या रहदारीस खूप मोठा अडथळा निर्माण झाला असून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उघड उल्लंघन झाल्याची नोंद पोलीसांनी घेतली आहे. दि. १५ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ८.४५ वाजेदरम्यान चावडी चौक परिसरात मोठा जमाव जमवून खासगी सोहळा रंगविण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी ५ ऑगस्ट रोजीच आदेश काढून २० ऑगस्ट पर्यंत मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) लागू केले असून, जमावबंदी व कठोर नियम घालून दिलेले होते. तरी सुद्धा आयोजक श्रीकृष्ण आनंदा शिंदे, रा. जाभरूण, ता. जि. बुलडाणा यांनी कोणतीही परवानगी न घेता हा कार्यक्रम धाडसाने केला. दरम्यान, बुलडाणा शहर पोलीस स्टेशनचे रात्रीचे अधिकारी पो.हे.का. कोकीळा तोमर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता वाहतुकीत मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. तपासाअंती स्पष्ट झाले की आयोजक श्रीकृष्ण शिंदे यांनी फक्त वाहतुकीचे वळण देण्यासाठी अर्ज केला होता, मात्र प्रत्यक्ष खासगी कार्यक्रमास कोणतीही अधिकृत परवानगी घेतलेली नव्हती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उघड उल्लंघन करून कायद्याला डोळेझाक देण्यात आली. या प्रकरणी श्रीकृष्ण शिंदे यांच्याविरुद्ध बुलडाणा शहर पोलीस




स्टेशनमध्ये मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऐका, हिमालयाच्या हाका!

## संपादकीय लेख

देवभूमी उत्तराखंडमधील धराली गावातील भूस्खलनाच्या घटनेनं देशाचं लक्ष पुन्हा एकदा हिमालयाकडं गेलं. याआधी केदारनाथ महाप्रलय, उत्तरकाशी बोगदा दुर्घटना, चमोली दुर्घटना अशा घटनांनी इथल्या विकासकामांबर प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. उत्तराखंड, हिमाचल, जम्मू-काश्मीर, लडाख आणि पंजाबचा काही भाग हिमालयात येतो. या भागांमध्ये दरड कोसळणं, जमिनीला भेगा पडणं, हिमनग कोसळणं या घटना नवीन नाहीत. इथलं पहाडी लोक या संकटांशी परिचित आहेत. अलीकडे मात्र या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यामध्ये नैसर्गिक कारणांबरोबरच मानवनिर्मित कारणांची भर पडली. आज हिमालयातील पर्यावरण, जैवविविधता, नैसर्गिक सौंदर्य या विषयांवर गांभीर्यानं विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मी उत्तराखंड आणि हिमाचलमध्ये कामानिमित्त राहिलो आहे, भरपूर प्रवास केला आहे. त्या काळात स्थानिकांशी गप्पा मारल्या, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केला. देशातील मोठा वर्ग आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला; या वर्गाच्या महत्त्वाकांक्षा वाढू लागल्या. सोशल मीडियानं पर्यटन ही जणू गरजच निर्माण केली. टुरिझम इंडस्ट्रीला चालना मिळाली. पूर्वी अक्षरशः अशक्य वाटणारी चारधाम यात्रा आता अगदी काही तासांमध्ये होऊ लागली. गोष्ट धर्माशी जोडलेली असल्यानं त्याची व्याप्ती इतकी वाढली, की आता दर वर्षी कोट्यवधी पर्यटक हिमाचल, उत्तराखंडची यात्रा करतात. हिमाचल, उत्तराखंड या राज्यांची अर्थव्यवस्था प्रामुख्यानं पर्यटनावर आधारित असल्यानं, साहजिकच सरकारी पातळीवर अधिकाधिक पर्यटक आकर्षित करण्याची धोरणं अवलंबली गेली. याचा परिणाम म्हणून २०२४मध्ये हिमाचलला अंदाजे दोन कोटी आणि उत्तराखंडला ८.५ कोटी पर्यटक आले होते. यामुळे सामाजिक, राजकीय व्यवस्थांबरोबर पर्यावरणावर किती अतिरिक्त ताण आला असेल! ङ्गअभी बहुत टुरिस्ट आते है, कोविड के बाद ज्यादा लोग आने लगे है. कभी कभी तो सारे होटल भर जाते है,फ बरकोटमधील एक होम स्टेचा मालक सांगत होता. बरकोट हे उत्तराखंडमधील यमुनोत्रीकडून गंगोत्रीकडं जाताना येणारं मुख्य गाव. इथं बरकोट-उत्तरकाशी रस्त्यावर पाच किलोमीटर लांबीच्या बोगद्याचं काम सुरू आहे. या बोगद्यामुळे ५० किलोमीटरचं अंतर अगदी १० मिनिटांत पार करता येईल; शिवाय कितीही बर्फवृष्टी झाली तरी रस्ता बंद होणार नाही. लाखो पर्यटक येतात, तेव्हा साहजिकच रस्ते रुंदीकरण, रेल्वे आणि त्या अनुषंगानं येणारे बोगदे, पूल बांधण्याची गरज निर्माण होते. ङ्गटनेल बन रहा है, यह अच्छी बात है, लेकिन आप टनेल का सारा मलबा सिधा यमुनाजी मी बहा दे रहे हो, तो कैसे चलेगा? इतने खतरनाक केमिकल्स सीधे नदी में छोड रहे है!फ त्याच बोगद्यामध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे गृहस्थ सांगत होते. बोगद्याचं काम करताना हिमालयात ङ्गड्रिलिंग ब्लास्टिंग पॅटर्नफ वापरावा लागतो. यामध्ये नियंत्रित स्फोट घडवून आणले जातात; तरीही भूस्खलनाचे धोके वाढतातच. भूस्खलन आणि जंगलांची कत्तल ही एकच समस्या नाही. बोगदा खोदताना निघणारा धूर, आवाज आणि जमिनीत मिसळणारी रसायनं यामुळे जैवविविधता धोक्यात येते. ड्रिलिंग ब्लास्टिंग पद्धतीमध्ये स्फोटामधून निघणारं शिसं, नायट्रोजन ऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड, अमोनिया असे अत्यंत घातक पदार्थ; तसंच खूप मोठ्या प्रमाणावर पॉलिथिन, प्लास्टिक, लुब्रिकेशन ऑइल, सिमेंट, लोखंडाचे तुकडे असे घटक पदार्थ मातीत; पर्यायानं नदीमध्ये मिसळत आहेत. त्यामुळे तिथली परिसंस्था धोक्यात आली आहे. बोगद्यातून निघालेला राडारोडा टाकल्यानं तिथल्या भूरूपांचा आकाराच बदलला आहे. नद्यांचे, ओढ्यांचे मार्ग बदलले आहेत. पाण्याच्या प्रवाहानं डोंगरउतारावर जमिनीची नव्यानं धूप होते. परिणामी, मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होतं. उत्तराखंड, हिमाचलमध्ये दर वर्षी भूस्खलनाच्या हजारो घटना घडतात. यातल्या बहुतांश घटना रस्ता रुंदीकरणामुळे होतात. हिमालय ठिसूळ आहे. त्यामध्ये पक्का खडक नाही. रस्ता रुंदीकरण करताना उतारावरील हजारो झाडं आपोआप कोसळतात. त्यामुळे भूस्खलनाचा धोका वाढतो.





हिमाचल, उत्तराखंडमध्ये फिरताना भरपूर हॉटेलं आणि रेस्टॉरंट मिळतात. बिलासपूरहून मनालीला जायला निघालो, तर प्रत्येक गावात हॉटेलं, कॅफे, होम स्टे मिळतील. आता हा प्रवास अगदी काही तासांमध्ये करता येणार आहे; कारण ङ्गबिलासपूर-मनाली-लेहफ असा रेल्वे प्रकल्प येऊ घातला आहे. ही रेल्वे सुरू झाली, तर या मार्गावरची हॉटेलं ओस पडतील. टॅक्सीचालक बेरोजगार होतील. या रेल्वेमुळे पर्यटन जरूर वाढेल; पण पर्यटनाचं असं केंद्रीकरण घातक ठरणार आहे. एका विशिष्ट ठिकाणी हजारो पर्यटक जमले, तर तिथल्या पर्यावरणावर आणि एकूणच व्यवस्थेवर प्रचंड ताण येतो. यातून गुंतागुंतीच्या समस्या उभ्या राहणार आहेत. हृषीकेश ते कर्णप्रयाग हा उत्तराखंडमधील असाच एक रेल्वे प्रकल्प होऊ घातला आहे. मी एकदा हिमाचल प्रदेशातील कुलूजवळ असलेल्या ङ्गबिजली महादेवफ मंदिरात गेलो होतो. हे मंदिर हिमाचली लोकांच्या श्रद्धेचं प्रतीक आहे. यासाठी तीन-चार किलोमीटर पायी ट्रेक करत जावं लागतं. हा ट्रेक पायी पूर्ण केला, तरच ङ्गशिवजी की कृपाफ होते, अशी स्थानिकांची श्रद्धा आहे. या रस्त्यावर अनेक दुकानं आणि छोटीमोठी हॉटेलं आहेत. यामुळे स्थानिकांना चांगला रोजगार मिळतो. इथं एक आजी चहा, सरबत विकून थोडेफार पैसे कमावतात. आता पर्यटनाला चालना म्हणून सरकार इथं रोप वे योजना आणू पाहत आहे. रोप वे आला तर त्या आजींचं काय होईल, असा प्रश्न पडतो. अर्थातच, यामध्ये स्थानिक पुढारी आणि बड्या कन्स्ट्रक्शन कंपन्यांचा फायदा आहे. हजारो झाडं याआधीच कापली गेलीत. स्थानिकांच्या मते त्यांची श्रद्धा आणि मूळ पहाडी परंपरांच्या हे विरोधात आहे. या रोप वे प्रकल्पाविरोधात २५ जुलैला इथं एक विराट मोर्चा निघाला होता. स्थानिकांची इच्छा नाही आणि पर्यावरणाला धोका आहे, तर सरकार हा प्रकल्प आमच्या माथी का मारत आहे, असा प्रश्न स्थानिक विचारतात.

# चिखली शहराच्या मध्यभागी करंट बॉम्ब

## एमीसीबी च्या बेपर्वाईने तरुण गंभीर!

**जनसंचलन/बुलडाणा**

चिखलीच्या बाबुलॉज चौकात आज दुपारी घडलेल्या धक्कादायक घटनेने नागरिक घाबरले. पुंडलिक नगर येथील यश राजू कोतवाल (वय २५) हा प्लंबर एका घरावर पाण्याची टाकी बसवत असताना वरून गेलेल्या च्या ११ केव्ही खुल्या तारांच्या संपर्कात आला. क्षणभरातच प्रचंड करंट बसल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शहराच्या मध्यभागी अशा जीवघेण्या तारांचे उघडपणे झुलत राहणे म्हणजे रोजच नागरिकांच्या डोक्यावर ङ्गकरंट बॉम्बफ टांगल्यासारखे आहे. ही दुर्घटना च्या थेट निष्काळजीपणाचे परिणाम असल्याचा नागरिकांचा संताप उसळला आहे. आता तरी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. मोठी गंभीर घटना येथे घडली आहे








*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शहापूरमध्ये तरुणाने महिलेला संपवलं, पाच दिवसांत पोलिसांकडून घटनेचा उलगडा; हत्येचा छडा लावत आरोपी ताब्यात



**ठाणे :** शहापूर तालुक्यातील एका फार्महाऊसमध्ये एका ज्येष्ठ महिलेची हत्या केल्यानंतर त्यांच्या अंगावरील दागिने चोरी करत अन्य एका ज्येष्ठ महिलेवर जिवघेणा हल्ला केल्याच्या प्रकरणाचा ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत तरुणाला अटक केली आहे. कपड्याचे दुकान चालवणारा हा तरुण कर्जबाजारी झाला होता. त्याला दुकानात कपडे खरेदी करायचे होते. त्यासाठी त्याने हा गुन्हा केल्याची बाब चौकशीत समोर आल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.ठाण्यातील घोडबंदर भागातील पातलीपाडा येथे राहणारे नरेश दलवाणी (५७) यांचे शहापूर तालुक्यातील गांडुळवाड येथे फार्म हाऊस आहे. या फॉर्म हाऊसमध्ये आरोपीने प्रवेश करत नरेश यांची बहिण विना हरपलानी (७५) यांची हत्या केली. नंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी, हातातील बांगड्यांची चोरी केली. तसेच, आरोपीने नरेश यांची ९७ वर्षांची आई लक्ष्मी दलवाणी यांच्यावर हत्याराने हल्ला करत त्यांना गंभीर जखमी केले. हत्या आणि हत्येच्या प्रयत्नाचा हा प्रकार १८ ऑगस्टच्या रात्री ८ ते दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडला होता. या प्रकरणी किन्हवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महेश कदम, रोहन शेलार, दिपेश किणी यांचे पथक करत होते.या पथकाने परिसरात काम करणारे कामगार, स्थानिक नागरिकांकडे चौकशी केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे या गुन्ह्याची उकल करत शिवाजी धसाडे (२७) याला ताब्यात घेत अटक केली. त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीला किन्हवली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.शहापूर तालुक्यातील ढाकणे येथे राहणारा आरोपी शिवाजी याने डोळखांब येथे कपड्याचे दुकान उघडले होते. मात्र, तो कर्जबाजारी झाला होता. पुढे सण, उत्सव असल्याने त्याला दुकानात कपडे खरेदी करायचे होते. त्याकरीता चोरलेल्या दागिन्यांची आरोपीने तत्काळ विक्री केली. या विक्रीतून त्याला चार लाख रुपये मिळाले होते. हे पैसे त्याच्या बँक खात्यात जमा असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक दिपेश किणी यांनी दिली.

---

## नांदेडमध्ये सिनेस्टाईल थरार; सराईत गुन्हेगाराला पकडण्यासाठी सापळा

### कुणकुण लागताच पळण्याचा प्रयत्न, पोलिसांचा गोळीबार

**नांदेड :** नांदेडमध्ये शनिवारी रात्री शहरात एका सराईत गुन्हेगार आणि पोलिसांमध्ये सिनेस्टाईल थरार पाहायला मिळाला. पोलिसांवर बंदूक ताणून अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न करून पळ काढणाऱ्या गुन्हेगाराच्या वाहनाच्या टायरवर पोलिसांनी गोळी चालवली. मात्र अंधाराचा फायदा घेत सराईत गुन्हेगार सूरजसिंघ गाडीवाले हा पळून जाण्यात यशस्वी झाला. शहरातील जुना कौठा भागात शनिवारी रात्री हा थरार घडला.

आरोपीवर अनेक गंभीर गुन्हे आहेत. दरम्यान गोळीबाराच्या घटनेनं परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं होतं. सराईत गुन्हेगार सुरजसिंग गाडीवाले हा मोस्ट वांटेड आकाशसिंग गाडीवाले यांचा भाऊ आहे. सूरजसिंघ याच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. तीन महिन्यापूर्वी तो जामिनावर सुटल्याची माहिती आहे. भाग्यनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान आरोपी हा आपल्या मित्रासोबत एका चारचाकी आलिशान वाहनातून कौठा परिसरात जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली.

त्यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडणासाठी कौठा रविनगर भागात सापळा रचला.पोलीस आपल्या मागावर असल्याची कुणकुण आरोपीला लागली. कौठा भागात येताच पोलिसांनी वाहन थांबण्याचा प्रयत्न केला, परंतु आरोपीने स्वतः जवळ असलेली बंदूक पोलिसांवर ताणली आणि गाडी अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. पळ काढत असताना पोलिसांनी वाहनाच्या टायरवर गोळीबार केला. दरम्यान, अंधाराचा फायदा घेत आरोपी भन्नाट वेगाने वाहन चालवून पसार झाला. दरम्यान गोळीबारामुळे टायर पंक्चर झाल्याने मामा चौक परिसरात वाहन सोडून आरोपी पसार झाला. यावेळी आरोपीसोबत अन्य तीन ते चारजण होते अशी माहिती आहे. दरम्यान, गोळीबाराच्या घटनेनं कौठा परिसरात खळबळ उडाली होती.

ऐन पोळा सणाच्या दिवशी नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मन हेलावून लावणारी घटना घडली आहे. येथे अतिवृष्टी, नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एका अल्पभूधारक शेतकऱ्याने गुरुवारी (२१ ऑगस्ट) गळफास घेऊन आत्महत्या केली होती. मुलाच्या निधनाचा मानसिक धक्का बसलेल्या आईने देखील घटनेच्या २४ तासाच्या आत प्राण सोडले आहे. या घटनेमुळे एका पाठोपाठ एक दोघांवर अंत्यसंस्कार करण्याची वेळ नातेवाईक आणि गावकऱ्यांवर आली. दरम्यान, या घटनेने फुलवळ गावावर एकच शोककळा पसरली आहे.

## दिवसा रेकी अन् रात्री दरोडा

### नागरिकांना हैराण करणाऱ्या चड्डी गँगच्या दरोडेखोरांना बेड्या; २८ धारदार चाकू जप्त...



**नाशिक:** नाशिकमध्ये चड्डी गँगच्या चार दरोडेखोरांना अटक करण्यात आली आहे. हे चोर दिवसा पायदान विकण्याच्या नावाखाली रेकी करायचे. रात्री दरोडा टाकायचे. पोलिसांनी त्यांच्याकडून २८ धारदार चाकू आणि एक कोयता जप्त केला आहे. ते पळसे शिवारात दरोड्याच्या तयारीत होते. दुसरीकडे, नाशिकरोड पोलिसांनी अवैध गॅस भरणा अड्डा उद्ध्वस्त केला आहे. एका व्यक्तीला अटक केली असून, ८२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. वेगवेगळ्या नावांनी वेगवेगळ्या जिल्ह्यांत दिवसा पायदान विक्रीच्या नावाखाली रेकी करून रात्रीच्या वेळी दरोडा टाकणाऱ्या हाफ चड्डी गँगच्या चार अट्टल दरोडेखोरांना अटक करण्यात आली. नाशिकरोड गुन्हे शोध पथकाने अंधारात भर पावसात मक्याच्या शेतात तासभर सिनेस्टाइल सर्च ऑपरेशन राबवून संशयितांना बेड्या ठोकल्या. या दरोडेखोरांकडे तब्बल २८ धारदार चाकू आणि एक कोयता अशा शस्त्रांचे घबाड आढळल्याने सुरुवातीला पोलिसही चक्रावून गेले. हे चारही दरोडेखोर पळसे शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत होते,

अशी माहिती परिमंडळ दोनचे पोलिस उपआयुक्त किशोर काळे, सहायक पोलिस आयुक्त डॉ. सचिन बारी यांनी शुक्रवारी (दि. २२) दिली.रवीकुमार भोई (वय २७, रा. अंबरनाथ, ता. कल्याण), शिवा विक्रम वैदू (३६, रा. आनंदनगर, जळगाव), विष्णू शंकर भोई (३०, रा. टायगर गाव, कल्याण फाटा, ता. कल्याण) आणि आकाश गोपाळ वैदू (३८, रा. पाचोरा जि. जळगाव) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

# पावसाळ्यातील सूप, प्या खूप



पावसाळी वातावरणात गरम पेये घशाला सुखावतात आणि शरीरात ऊबही निर्माण करतात, चिंब दिवसांतील ऊर्जापेये! बाहेर रिमझिम पावसाच्या सरी बरसत असताना, घराच्या खिडकीत आरामात बसून आल्याचे गरमागरम सूप पिण्याची कल्पनाच न्यारी! सूप पातळ असो किंवा थोडे दाटसर. पावसाळ्यात गरमागरम सूप म्हणजे उत्तम कम्फर्ट फूड!फ पावसाळा सुरू झाला की, पावसासोबत आजारही सुरू होतात. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अनेकदा दवाखान्याचा दौरा करावा लागतो.

पावसाळ्यात निरनिराळ्या भाज्यांचे सूप प्राशन करणे फायदेशीर ठरते. कारण, या सुपांमध्ये पोषण मूल्ये भरपूर असतात. काही पोषण मूल्यांच्या अभावामुळे सर्दी आणि फ्ल्यूसारखे आजार बळावतात; परंतु भाज्यांचे सूप प्यायल्याने या आजारापासून बचाव तर होतोच, पण आपले सर्वसाधारण आरोग्य आणि प्रतिकार क्षमता वाढते. आजारी माणसांपासून डाएटवर असणा-यांपर्यंत सगळ्यांसाठीच सूप हे अत्यंत पौष्टिक आणि उत्साहवर्धक टॉनिक आहे.

सूप म्हटलं की, हॉटेलमधील वाफाळता, बशीत ठेवलेला बाऊल, सूप स्पून, मस्त स्वाद.. असं सगळं डोळ्यांसमोर येतं. सूप, मग ते व्हेज असो किंवा नॉनव्हेज, हा सर्वांचा आवडता असा पदार्थ आहे. हॉटेलमधील जेवण, पार्टीतलं जेवण याची सुरुवात सूपनं होते खरी, पण मराठी घरगुती जेवणात सूप असतंच असं नाही. उत्तम मेजवानीच्या मेन्यूला स्टार्टर्सशिवाय पूर्णता नाही किंवा स्टार्टर्सशिवाय पुढच्या मेजवानीला चव येत नाही. म्हणूनच स्टार्टर्स हा रुची वाढवणारा, पोट भरू न देता खाद्यानंदाला पूर्णत्व देणारा खाद्यप्रकार आहे. आपण बाहेर जेवायला गेलो की, बरेचदा सूप मागवतो. ते स्टार्टर या गटात मोडत असलं तरी, ते पूर्ण अन्न आहे. कारण, सुपात शरीराला आवश्यक ते पोषक घटक असतात. म्हणूनच आजारपणात डॉक्टर पेशंटना सूप देण्याचा सल्ला देतात. आजकाल रेस्टॉरंटमध्ये वेगवेगळ्या प्रकारची अनेक सूप सर्व्ह केली जातात. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच सूप हा प्रकार आवडतो. सूपला नाक मुरडणारं क्वचितच कुणी भेटेल. ब्रेकफास्ट राजासारखा घ्यावा, दुपारचं जेवण राजकुमारासारखं आणि रात्रीचं जेवण एखाद्या गरीब माणसासारखं घ्यावंफ अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. असं असलं तरी ख-या खवय्यांना कोर्समध्ये जेवण घ्यायला आवडतं आणि बरेचदा या जेवणाची सुरुवात सूपने होते. स्टार्टर म्हणून सूपचं सेवन करण्यामागे अशी कल्पना आहे की, सूप तुमची भूक वाढवतं आणि त्यामुळे तुम्ही जेवणाचा आनंद घेऊ शकता.

सूप हा खरं तर भारतीय प्रकार नाही; परंतु हल्ली भारतीय जेवणातही सूपचं सर्रास सेवन होतं आणि खास भारतीय चवीची सूपही मिळतात. आपल्याकडे चायनीज गाड्यांवर मिळणारी सूपही बरीच लोकप्रिय आहेत. मंच्याव, मंच्युरियन, हॉट न सोर आणि टोमॅटो सूप आपल्याकडे आवडीने खाल्ली जातात. पालक सूप, टोमॅटो सूप, मिक्स व्हेज सूप, बीट सूप, गाजर-सफरचंद सूप, हिरव्या वाटाण्याचं सूप, कोरिअंडर लेमन सूप, चवळीच्या देठाचं सूप, गाजराचं क्रीम सूप, मशरूम सूप, लाल ढोबळ्या मिरचीचं सूप, स्वीट कॉर्न सूप, बार्ली-मूग सूप त्याचबरोबर चिकन किंवा फिशमध्येही वेगवेगळ्या स्वादाची सूप बनवली जातात. या सगळ्या सूपची चव प्रत्येकाने एकदा तरी चाखावीच. सूप व्हेज आणि नॉन व्हेज या दोन्ही प्रकारांत मिळतं. भाज्या किंवा मटणासारखे पदार्थ आणि इतर काही द्रवपदार्थ पाण्यात शिजवून सूप बनवलं जातं. भाज्या आणि मटणाचा स्वाद पाण्यात पूर्णपणे उतरत नाही, तोपर्यंत ते शिजवत राहून सूप बनवलं जातं. सूपचे जे दोन मुख्य प्रकार समजले जातात, ते म्हणजे पातळ आणि घट्ट सूप. पातळ सूपमध्ये भाज्या किंवा मटणाचं केवळ सत्त्व असतं.

# टच.. टू टच!



खरं तर मैत्री म्हणजे सदाफुली! सतत फुलत राहणारी, त्या मैत्री रोपाला रोज छान भावनेचं, आपुलकीचं खतपाणी घातलं तर हे रोप नेहमी प्रफुल्लित फूल देतं आणि त्याचा दरवळ आयुष्य भारून टाकतो. आधी ओळख, त्यातून झालेली मैत्री अधिक दृढ, घट्ट आणि प्रगल्भ होण्यासाठी मैत्रीत एकमेकामंध्ये खूप झिरपणं व्हावं लागतं. या झिरपण्यासाठी एकमेकांना सांभाळणे, समजणे, समजून घेणे हे अत्यंत आवश्यक असतं. या रोपाचं वृक्षात रूपांतर व्हायला सुरुवातीला त्याला तळहातावर घेऊन त्याची निगराणी केली तर नंतर फक्त ही मैत्री शीतल छाया देणारी असते.

फेसबुक ॲप्लिकेशन ऑन केलं की, हल्ली रोज नवनवीन मित्र-मैत्रिणींच्या फेंड्रस रिक्वेस्ट स्क्रिनवर दिसतात आणि फक्त त्याच्या नावासमोर टच केल्यावर तो किंवा ती आपला मित्र किंवा मैत्रीण बनते. बदलत्या तंत्रज्ञानाला आपण मित्र मानल्यामुळे याचा अनुभव स्वाभाविकपणे आपण सगळेजण घेतो आणि फेस बघून आपल्या बुकमध्ये त्याचे नाव समाविष्ट करतो.

याच धर्तीवर मला ७ च्या आत घरात या चित्रपटातील युवराजचे वाक्य आठवते आमच्याकडे अशीच फ्रेंडशीप मागतात बडीशेप मागितल्यासारखी! बडीशेपसारखी फ्रेंडशिप आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात मिळत असली तरी तिचाही आपण चांगल्या पद्धतीने आस्वाद घेऊन नवा सुगंध आयुष्यामध्ये दरवळू शकतो. गरज आहे ती मैत्रीच्या वेलीवर येणा-या फुलाला समजून घेण्याची!

खरं तर मैत्री हा आपल्या सगळय़ांच्याच आयुष्यातील अत्यंत जिव्हाळय़ाचा आणि भावनिक विषय. बाल्यावस्थेपासून किशोर, तरुण, प्रौढ ते थेट वृद्ध होईपर्यंत. मैत्रीचा सिलसिला प्रत्येक ऋतूत बहरत असतो आणि ही मैत्री कधी वृद्ध होत नाही. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सुख-दुःखाच्या प्रसंगी आठवते ती मैत्री! खरं तर मैत्री म्हणजे सदाफुली! सतत फुलत राहणारी, त्या मैत्री रोपाला रोज छान भावनेचं, आपुलकीचं खतपाणी घातलं तर हे रोप नेहमी प्रफुल्लित फूल देतं आणि त्याचा दरवळ आयुष्य भारून टाकतो.

आधी ओळख, त्यातून झालेली मैत्री अधिक दृढ, घट्ट आणि प्रगल्भ होण्यासाठी मैत्रीत एकमेकामंध्ये खूप झिरपणं व्हावं लागतं. या झिरपण्यासाठी एकमेकांना सांभाळणे, समजणे, समजून घेणे हे अत्यंत आवश्यक असतं. या रोपाचं वृक्षात रूपांतर व्हायला सुरुवातीला त्याला तळहातावर घेऊन त्याची निगराणी केली तर नंतर फक्त ही मैत्री शीतल छाया देणारी असते. कारण मैत्रीचं नातंच मुळात आनंदाचं सौख्याचं!

कॉलेज जीवनात वयाबरोबर बुद्धीचा पण विकास होत जातो. तशी ही मैत्री या टप्प्यावर जास्त खुलते, रंगतदार होते. मैत्रीला वयाचे बंधन नाही, तसेच जात-धर्म भाषा, लिंग याचंही कुंपण नाही. निसर्गाचा नियम म्हणून वाढण्यापेक्षा प्रसंगी हातात हात घट्ट धरून बुद्धीनिष्ठ बनवते ती प्रगल्भ मैत्री! फक्त पिकनिक, गप्पा, गेट टुगेदर आणि डे ज्या रूपात सजणारी मैत्री, सजत असली तरी ती रुजत नाही! त्यासाठी गप्पांऐवजी संवाद झाला, पिकनिकसोबत आनंदाची सहल झाली तर आयुष्याची सफर या नात्याचा महोत्सव करते.

मैत्रीमध्ये राग-रुसवे हवेत, प्रसंगी कान पकडण्याची धीटाईपण हवी. मी तुला स्वीकारले ते सगळय़ा गुण-दोषांसकट हा भाव एकदा निर्माण झाला की, ही मैत्री प्रसंगी कट्टी-बट्टीच्या सोबत आपला जीवन प्रवास सुखकर करते. मित्राच्या चांगल्या गोष्टीचं अनुकरण आणि आपला मित्र किंवा मैत्रीण चुकीच्या वळणावर जात असताना त्याचा तोल सांभाळताना त्याची सोबत न सोडणं या गोष्टी मैत्रीला जास्त स्निग्ध करतात.

मैत्रीमधून प्रेरणा विकसित व्हावी. हीच मैत्री कौतुकाची थाप द्यायला लागली की, एक मेकांसोबत स्पर्धा न करता भान ठेवून आपण यशाच्या शिखरावर विराजमान होतो आणि हे त्या मैत्रीला पण अपेक्षित असते. फक्त कौतुक नाही तर प्रसंगी टीकात्मक परीक्षणही करणे आपल्या सान्निध्याने आपण आपल्या मित्राला किंवा मैत्रिणीला त्याच्या/तिच्या ध्येयापर्यंत घेऊन जाऊ शकलो याचे समाधान वेगळी चकाकी देणारे असते. मैत्री म्हणजे फक्त हातात हात नाही तर ती संजीवनी! ही रुजवलेली मैत्री आणि त्यातून निर्माण होणा-या सुगंधी आठवणी यांची जपणूक करायला कितीही जीबीचे मेमरी कार्ड पुरत नाही. व. पु. काळेंचे एक सुंदर वाक्य आहे, साय दुधातूनच निर्माण होते आणि दुधावरच छत धरते. पण, म्हणून त्या दुधाला सायीचं ओझं वाटत नाही.फ मैत्रीचेही तसेच असावे! फक्त एकमेकांसोबत फोटो घेण्यापेक्षा एकेमकांच्या मनात रुजणारी मैत्री साजरी करूया. मैत्रीतून स्वप्ने निर्माण होतात आणि या स्वप्नांबद्दल व. पु. म्हणतात, स्वप्नांना जास्त टवटवीतपणा असतो. कारण, त्याच्यामध्ये एक जास्तीचा रंग असतो तो म्हणजे अंतरंग! मग आपण कुठेही असलो तर ही मैत्री आपणाला टच मध्ये ठेवते आणि नेटवर्कशिवाय आपण एकेमकांसोबत कनेक्ट राहतो!

# २९ ऑगस्टला फाईट, चलो मुंबई, मनोज जरांगे ठाम, राज्य सरकारचं टेन्शन वाढलं

**बीड :** राज्य सरकारचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. मनोज जरांगे पाटील यांची आज बीडच्या मांजरसुंबा येथे बैठक पार पडली. या बैठकीत येत्या २९ ऑगस्टला मुंबईत मोर्चा काढायचा की नाही? याबाबत चर्चा झाली. या बैठकीनंतर मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला संबोधित केलं. यावेळी मनोज जरांगे यांनी मोर्चा मुंबईत घेऊन जाण्यावर ठाम असल्याचं स्पष्ट केलं.




यावेळी मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलकांना काही मोलाच्या सूचनादेखील दिल्या. आपल्या आंदोलनात जाळपोळ किंवा दगडफेक करुन आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावं. शांततेने मुंबईच्या दिशेला मोर्चा घेऊन जायचा, असं आवाहन मनोज जरांगे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केलं. बीडचे मराठे एकत्र यायला लागले आहेत. तुम्हाला काय सांगू? तुम्ही एकत्र आल्यामुळे त्यांची अशी फाटली... मला इथे आल्यावर लक्षात आलं. आपण एकत्र आल्याने समाजाला न मिळणाऱ्या गोष्टी मिळायला लागल्या हे समजून घ्या. गडबळ, गोंधळाने आपल्या समाजाच्या लेकरांचं वाटोळं होत आहे. कोणत्या वेळेला कोणतं पाऊल उचलायचं हे मराठ्याला लवकर समजायला हवं. परिस्थितीने मराठ्यांवर संकट आणून सोडलं आहे. या संकाटात आपण पुढचा काळ लढणार आहोत, असं मनोज जरांगे म्हणाले.तुमच्या आधी माझ्या भावनेचा ह्यांनी आतापर्यंत उपयोग केला आहे. म्हणून माझ्या मराठा समाजाला माझं प्रत्येक वेळेस हात जोडून आवाहन असतं, बाबाहो, आपली ताकद लयी मोठी आहे. फक्त आपण विचारांनी चाललो नाहीत म्हणून आपल्या लेकरांचं नुकसान झालं. यापुढे आपण इतरांच्या डोक्याने चालायचं नाही. स्वत:च्या डोक्याने चालायचं आणि जात उंचावर न्यायची. बस झालं आता, ज्याने यायचं त्याने नाटक शिकवायचं, त्याने यायचं आणि आपलं ज्ञान आम्हाला पाजळून जायचं. उभ्या पिढ्यांचं वाटोळं झालं, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.उन्हातान्हात आजकाल कुणी बसत नाही. मला तुमचा गर्व वाटतो. तुम्ही उन्हात पावसात कशाचा विचार करत नाहीत. मायबाप समाजानो तुमच्यासाठी मी सुद्धा कशाचा विचार करत नाही. मरायचा सुद्धा विचार करत नाही. विचार करुन पुढच्या लढाया लढायच्या आहेत. मला फोन आले आहेत. मी फोनवाल्याला सांगितलं की, एकही मराठ्याची अस्सल अवलाद माघारी जाऊ शकत नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.तुम्ही गर्व वाटावं असं काम करत आहेत. बीडचं हे नुसतं रुप बघून सरकारला रातभर झोप राहणार नाही. बेजार होणार. चलो मुंबई. २९ ऑगस्टला जमून फाईटच आहे. मला म्हणतात, तुला हाणीन. मी म्हटलं, मला? अरे तुम्ही आई-बहिणींचं रक्त साडलं आहे, माझ्या माय-बहिणी रक्ताच्या थारोळ्यात टाकल्या. यावेळी तुम्ही पोरांना डिवचून दाखवा. काय मराठ्यांची अवलाद आहे ते आम्ही तुम्हाला दाखवतो. आपल्याला शांततेत जायचं आहे आणि शांततेत आंदोलन करायचं आहे, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.आरक्षणासाठी ही शेवटची लढाई आहे. मुंबईला येण्याची हौस नाही. पण लेकरंबाळांसाठी यावं लागतंय. २९ ऑगस्टला मुंबईला जायचं आहे. २७ ऑगस्टला सकाळी १० वाजता आंतरवलीतून मुंबईला निघायचं.

समाजाला डाग लागेल असं पाऊल उचलायचं नाही. कुणी दगडफेक आणि जाळपोळ करायची नाही, असंदेखील आवाहन त्यांनी केलं.सरकार आपल्याला खूश करण्यासाठी वेगवेगळ्या घोषणा देईल आणि त्यांचेच पाठवलेले लोकं म्हणतील, फडणवीस देत नाही आणि हाणा दगडं. हे घडू शकतं. आपल्यापासून ५ फुटाच्या अंतरावरही दगडफेक होऊ शकते. पण लक्ष द्यायचं नाही. आपल्याला माहिती नाही म्हणायचं आणि सरळ मुंबईकडे चालायचं. एकाने सुद्धा हलायचं नाही, अशी महत्त्वाची सूचना मनोज जरांगे यांनी दिली

## भरधाव कारचा टायर फुटला, चालकाचं नियंत्रण सुटलं, विचित्र अपघातात तिघांचा मृत्यू

**वर्धा :** वर्ध्याहून नागपूरला जाणाऱ्या कारचा टायर फुटल्याने चालकाचं नियंत्रण सुटलं आणि कार रस्त्याच्या दुभाजकावर आदळून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने भरधाव येणाऱ्या ट्रकला धडकली. या भीषण अपघातात कारमधील तिघांचा मृत्यू झाला आहे. तर एक जण जखमी झालं आहे. ही घटना तुळजापूर नागपूर मार्गावर खडकी नजीक सामाजिक वनिकारणच्या नर्सरीजवळ सायंकाळी आज साडेपाच वाजता घडली आहे. वर्ध्याच्या जुनघरे परिवारातील सदस्य हे नागपूर येथे कारने जात असताना हा भीषण अपघात घडला आहे. या अपघातात दोन महिला तर एक २५ वर्षीय तरुण अशा तिघांचा मृत्यू झाला आहे. मृतदेह सेलू येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदणासाठी पाठविण्यात आले आहेत.भरधाव कारचा टायर अचानक फुटला. अशातच चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटलं. वाहन दुभाजकावर आदळून रस्त्याच्या बाजूला गेलं. अचानक आलेल्या ट्रकची धडक कारला लागली. यात कारमधील तिघांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला. वर्धा-नागपूर मार्गावरील आमगाव फाटा परिसरात अपघात पाहून अनेकजण धावून आले. एम. एच. ४३ बी. एन. १९८६ क्रमांकाच्या कारने चौघेजण वर्धेकडून नागपूरच्या दिशेने जात होते. कार खडकी-आमगाव फाटा दरम्यान आली



असता भरधाव कारचा टायर अचानक फुटला. वाहनाचा टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटलं. वाहनावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न सुरू असताना कार दुभाजकावर आदळली.अशातच रस्त्याने येणाऱ्या ट्रकने कारला जबर धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की कार रस्ता दुभाजक ओलांडून थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपात शिरली. अपघात झाल्याचं लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. शिवाय जखमीला सेवाग्राम येथील रुग्णालयाकडे रवाना केलं. या अपघातात कारमधील तिघे दगावल्याचं तर एक गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. या अपघाताची नोंद सिंदी पोलिसांनी घेतली आहे.

## कामावर जाताना घात झाला, सर्पदंशाने गरीब व्यक्तीचा जीव गेला; गावात हळहळ

**रत्नागिरी :** सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यूमुळे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. कामावर जातानाच मोठा घात झाला आणि त्यातच या इसमाचा मृत्यू झाला. मोल मजुरीला जाताना एका ४८ वर्षीय इसमाचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. नरेंद्र शंकर आंबेकर, (वय ४८, व्यवसाय शेती मोलमजुरी, रा. होसकरवाडी, गोळप ) असं या मृत्यू झालेल्या इसमाचं नाव आहे. ही मोठी दुर्दैवी घटना रत्नागिरी तालुक्यातील गोळप येथे घडली आहे. २२ ऑगस्ट रोजी नरेंद्र शंकर आंबेकर हे मजुरीसाठी चालत निघाले होते. त्याचवेळी उजव्या पायाच्या घोट्यावर नाग जातीचा (कोब्रा) चावला आणि त्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागले.नरेंद्र हे गावातील आनंदा राजाराम बापट यांच्याकडे गडगा घालण्याचं काम करत होते. त्यासाठी



मजुरीचे कामासाठी पायवाटेनं चालत जात होते. त्याचवेळी गावातील कुंभारवाडी धारेजवळ बापट यांचे खळ्याजवळ आल्यावर नरेंद्र यांच्या उजव्या पायाच्या घोट्यावर नाग जातीचा (कोब्रा) या विषारी सापाने सर्पदंश केला. नरेंद्र यांच्या नातेवाईकांनी सिव्हील हॉस्पिटल, रत्नागिरी येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आलं.

त्यांच्यावर सिव्हिल हॉस्पिटल, रत्नागिरी येथे उपचार सुरु असताना त्यांचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी, चार भाऊ असा परिवार आहे. कोकणातील या हसत्या खेळत्या कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. या घटनेची नोंद पूर्णगड सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे अधिक तपास पूर्णगड पोलीस करत आहेत.

# कौतुकानं कार्यकर्त्याने बोलावलं, वाटलं फाशी देतो काय? मी थरथरलो..., मंत्री शिरसाटांनी सांगितला जुना किस्सा

**छत्रपती संभाजीनगर :** मंत्री संजय शिरसाटांनी कार्यकर्त्यासोबतचा एक किस्सा सांगितला आहे. माझा एक कार्यकर्ता आला. कार्यकर्त्याने ८ लाखांचा डीजे आणला तिथे मला बोलावलं. अंबादास दानवे देवा शप्पथ सांगतो, माझ्या हृदयाचे ठोके वाढले होते. आठ लाखांच्या डीजेचा एवढा आवाज होता की, मी तिथे खालपासून वरपर्यंत थरथरत होतो. डीजेमुळे शारीरिक नुकसान होऊ शकतं, त्यामुळे वापर टाळा असे आवाहन करताना मंत्री शिरसाटांनी हा किस्सा सांगितला आहे.

अवघ्या काही दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर शहरातील पोलीस आयुक्तालय शांतता समितीच्या बैठकीच्या आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी मंत्री संजय शिरसाट बोलत होते. या बैठकीसाठी विधान



परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री खा. भागवत कराड, खा. कल्याण काळे, आ. प्रदीप जयस्वाल, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी श्रीकांत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.माझा एक कार्यकर्ता आला. त्याने माझे तोंडभरून कौतुक केलं. कार्यकर्त्याने ८ लाखांचा डीजे आणला तिथे मला बोलावलं. माझ्यासाठी १०० किलोंचा फुलांचा हार आणला. मला वाटलं माझ्या वजनापेक्षा जास्त वजनाचा तो हार गळ्यात टाकून फाशी देतो की काय? अंबादास दानवे देवा शप्पथ सांगतो, माझ्या हृदयाचे ठोके वाढले होते. आठ लाखांच्या डीजेचा एवढा आवाज की मी तिथे खालपासून वरपर्यंत थरथरत होतो. डीजेमुळे शारीरिक नुकसान होऊ शकतं, त्यामुळे डीजे वापरू नका... असा किस्सा शिरसाटांनी सांगितला.शिरसाट पुढे म्हणाले, सर्व गणेश मंडळाचे अध्यक्षांना माझा आव्हान आहे डीजे बंद ठेवा. माझ्याकडे एक व्यक्ती आला तो म्हणाला सुप्रीम कोर्टाचा आदेशावरून पोलिसांनी भोंगे उतरवले. तुम्ही डीजे बद्दल काय करणार सांगा म्हणाला. भोंगे उतरवल्यानंतर आता काही लोक वाद कसा पेटेल यासाठी डोळ्यात तेल घालून बसले आहे.

यामुळे डीजे लावू नका, मी गणेश मंडळाच्या अध्यक्षांना विनंती करतो. डीजे पेक्षा चाळीसगाव, वैजापूरचा बँड लावा पैसे कमी पडले तर सगळे नेते आहेतच. काही नाही जमलं तर मी आहेच. माझी बॅग उघडीच आहे. व्हिडिओ चालत राहतील. शिरसाट याची चिंता करतो का? उलट लोक आपल्याला करोडपती समजत असेल तर आपल्या बापाचं काय जातं? माझा हा डायलॉग देखील फेमस झाला आहे, असे शिरसाटांनी म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# देवेंद्र फडणवीस आणि संपूर्ण भाजप अर्धवट ज्ञानी

## त्यांचा गुडघ्यातही मेंदू नाही; राऊत बोलता-बोलता बरंच बोलले




**मुंबई:** काही दिवसांपूर्वी सीमेवर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना होऊ नये, अशी भूमिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने घेतली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेनं या मुद्द्यावरून भाजपला घेरल्यानंतर काल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पलटवार केला. जावेद मियाँदाद या क्रिकेटरला जेवायला बोलवणाऱ्यांनी या विषयावर बोलू नये, असं फडणवीस म्हणाले. फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर संजय राऊत यांनी आज संताप व्यक्त करत भाजपचा आक्रमक शब्दांत समाचार घेतला आहे. देवेंद्र फडणवीस अर्धवट ज्ञानी आहेत. मुळात संपूर्ण भाजप हाच अर्धवट ज्ञानी आहे. भाजपवाल्यांच्या गुडघ्यातही मेंदू नाही. जावेद मियाँदाद मातोश्रीवर काय बोलले, हे दिलीप वेंगसरकर यांना विचारा. पैशासाठी भाजपने पाकड्यांसमोर शेपूट घातली आहे, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला आहे.देवेंद्र फडणवीसांना उत्तर देताना संजय राऊत पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाकरे चित्रपट पाहायला हवा. त्यावेळीच्या मुलाखती समजून घ्यायला हव्यात. जावेद मियाँदाद हे बाळासाहेबांना भेटायला आले होते. भारत-पाकिस्तान क्रिकेटला विरोध करू नका, असं ते सांगणार होते. पण बाळासाहेबांनी त्यांना चहा घ्यायला सांगितला आणि परत पाठवले. दहशतवाद आणि क्रिकेट या दोन्ही गोष्टी एकत्र चालणार नाही, असं बाळासाहेब त्यांना म्हणाले होते,ह्न अशी आठवण राऊत यांनी करून दिली आहे.

बाळासाहेबांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणे शेपूट घातली नव्हती. जर तुम्हाला कुंकवाची कदर असेल, तर अशी विधाने करू नका, अशा शब्दांत संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना सुनावलं आहे.

दरम्यान, तुम्ही आरशाची फॅक्टरी सुरू केली आहे. पण त्यामध्ये तुम्हाला तुमचे खरे रूप दिसेल. पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट खेळण्यास तुमचा पाठिंबा आहे की नाही? पैशासाठी तुम्ही पाकड्यांसमोर शेपूट घातली, असा आरोप संजय राऊतांनी भाजपवर केला आहे

# मुंबईतील मालाडमध्ये रहिवासी इमारतीला भीषण आग



**मुंबई:** मुंबई शहरातील मालाड पूर्व इथं आज एका रहिवासी इमारतीला आग लागल्याची घटना घडली आहे. मालाड पूर्वेतील राणी सती मार्गावर असलेल्या वैष्णवी हाइट्स या इमारतीला दुपारच्या सुमारास भीषण आग लागली. या इमारतीत काही रहिवासी अडकल्याची भीती असून दुर्घटनेबाबतची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० ते १२ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. जवानांकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात असून सुदैवाने या आगीत जीवितहानी झाली नसल्याचे समजते. मिळालेल्या माहितीनुसार, मालाडमधील वैष्णवी हाइट्स या इमारतीच्या ११ व्या मजल्यावर आज दुपारी साडेतीन ते चार वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. त्यानंतर इमारत परिसरात मोठा गोंधळ उडाला. स्थानिकांनी या दुर्घटनेची माहिती अग्निशमन दलाला दिल्यानंतर काही वेळातच १० ते १२ गाड्यांसह अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तसंच दिंडोशी पोलीस ठाण्याचे कर्मचारीही काही वेळातच वैष्णवी हाइट्स इथं पोहोचले. अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग विझवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.वैष्णवी हाइट्स ही रहिवासी इमारत असल्याने या इमारतीत अनेक नागरिक वास्तव्यास होते. आग लागलेल्या मजल्यावरील रहिवाशांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी अग्निशामक दलाचे जवान आणि स्थानिक पोलिसांकडून प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे. तसंच लवकरात लवकर ही आग विझावी जेणेकरून आग इतर मजल्यांवर पसरू नये, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, या आगीत सुदैवाने जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे. मात्र आगीने रौद्ररूप धारण केल्याने ११ व्या मजल्यावरही काही घरांमधील सर्व सामान जळून खाक झाले आहे.

# हुतात्मा स्मारक, फ्लोरा फाउंटन येथील अर्धनग्न शिल्प झाकण्याची मागणी मान्य

## बुलढाण्यातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणीला यश

**जनसंचलन/ लोणार**

हुतात्मा स्मारक, फ्लोरा फाउंटन येथील अर्धनग्न शिल्प झाकण्याची मागणी मान्य जिल्हाधिकारी कार्यालयातून मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. हुतात्मा स्मारक, फ्लोरा फाउंटन परिसरातील अर्धनग्न शिल्प झाकण्याची मागणी आता अधिकृत पातळीवर मंत्रालयाकडे पोहोचली आहे. बुलढाणा येथील सामाजिक कार्यकर्ते आकाश दत्ता भुतेकर व दुर्गेशसिंग युवराजसिंह पवारें शुभम करे यांनी दिनांक ३ ऑगस्ट ला हुतात्मा स्मारक समोर मुंबई येथे निदर्शन केलेत व ४ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या निवेदनाची दखल जिल्हाधिकारी व जिल्हदंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी घेतली. निवेदन मध्ये १०७ हुतात्मा चे संयुक्त महाराष्ट्र व मुंबई साठी असलेलं एकमेव हुतात्मा चे स्मारक समोर असलेलं फ्लोर चे अर्धनग्न शिप्ला वर तीव्र आक्षेप घेऊन योग्य रीतीने झाकण्याची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन द्वारे आणि निदर्शन द्वारे केली सदर मागणीच गंभीर्यपूर्वक दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी सदर मागणी सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली असल्याचे अधिकृत पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, अर्धनग्न शिल्प हुतात्मा स्मारकाजवळ असल्याने महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि




१०५ हुतात्म्यांच्या स्मृतींचा अपमान होतो. त्यामुळे या शिल्पावर संस्कृत आवरण घालण्यात यावे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून आता या मागणीवर पुढील निर्णय होणार असून, महाराष्ट्रभरातून या विषयावर चर्चेला उधाण आले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# बुलढाण्यात फिट इंडिया! देखना है कल तो चलाओ सयकल!




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या पुढाकारातून ङ्गफिट इंडियाङ्घ मोहीमे अंतर्गत बुलढाणा पोलिस दलाच्या वतीने आज सायकल थॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिक व पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा सक्रिय सहभाग लाभला. या उपक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे ङ्गफिटनेस की डोस, आधा घंटा रोजफ्ङ हा संदेश प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि फिटनेसला दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवणे हा आहे. या स्पर्धेत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह पोलिस कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी, मुली, महिला तसेच सामान्य नागरिकांनी सुद्धा मोठा सहभाग घेतला होता. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्पर्धेला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. नागरिकाचे आरोग्य अबाधित राहिले पाहिजे या उद्देशातून जनजागृती व्हावी यासाठी या स्पर्धेच आयोजन करण्यात आले होते.तर पोलिस दलाच्या वतीने जिल्ह्यात नशामुक्त बुलढाणा जिल्हा हा सुद्धा उपक्रम राबवल्याजात

# महाकाय १२ किलोंच्या अजगराला जीवदान!

**जनसंचलन/बुलढाणा**

तब्बल ७० फुट खोल विहिरीत ६ फुट लांबीचा आणि १२ किलो वजनाचा महाकाय अजगर उदमांजर व तिचे पिल्ले खाण्यासाठी गेला होता.शिकार केल्यानंतर तो सुस्त पडला. दरम्यान एका जणाला विहिरीत तो निदर्शनास आल्याने सर्पमित्रांना पाचारण करण्यात आले होते. सर्पमित्रांनी जीव धोक्यात घालून या अजगराला जीवदान दिले आहे. ही घटना बिरसिंगपूर येथे २४ ऑगस्ट रोजी समोर आली. साप म्हटलं तरी अंगावर काटा येतो. साप असा एक खतरनाक प्राणी आहे की, त्याच्या एका चाव्याने माणसाचा जागीच मृत्यू होऊ शकतो. जगात अनेक विषारी साप आहेत. ज्यांच्या पासून लांब राहणे केव्हाही चांगले. अजगर हा जगातील असा प्राणी आहे, जो स्वत:पेक्षा मोठ्या प्राण्यांनाही गिळू शकतो. जर कुणी अजगराच्या तावडीत सापडले तर त्याची सूटका होणे सगळ्यात अवघड



असते. असाच एक महाकाय अजगर बिरसिंगपूर येथील शिवाजी कड यांच्या शेतातील ७० फुट खोल विहिरीत आढळला.या अजगराने विहिरीत असलेल्या उदमांजर व त्यांच्या पिलांना गिळंकृत केले होते.शिवाजी कड यांना हे दृश्य दिसून आल्यानंतर त्यांनी सर्पमित्र श्रीराम रसाळ व वन विभागाचे कर्मचारी खान तसेच सर्पमित्र, पवन मुळे प्रथमेश शिरसाठ घटनेबद्दल माहिती देऊन पाचारण केले. सर्पमित्रांनी खोल विहिरीत उतरून अजगराला सुरक्षित पकडले असून, या अजगराला वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चिखलीत अट्टल गुंड बिझनीस पोलीसांच्या जाळ्यात चाकुचा धाक दाखवत पैसे लुटणारा कुख्यात चोरटा अखेर तुरुंगात!

जनसंचलन/ चिखली

चिखली शहरात दहशत माजवणारा आणि वारंवार गंभीर गुन्ह्यात अडकलेला गजानन उत्तम जाधव उर्फ बिझनीस अखेर पोलिसांच्या तावडीत आला आहे. चहा हॉटेल व्यवसायिकाला चाकूचा धाक दाखवून जबरीने पैसे लुटण्याच्या प्रकरणी त्याला अटक करण्यात आली आहे. फिर्यादी अनिल ओंकार जाधव (वय २२, रा. गोरक्षणवाडी, चिखली) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी ते धान्य मार्केटमध्ये चहाची ऑर्डर देऊन बाहेर पडताच आरोपी बिझनीसने त्याच्या पोटाशी चाकू लावून खिशातील पैसे देण्याची धमकी दिली. त्याने फिर्यादीच्या खिशातील तब्बल १५०० रुपये हिसकावले. विरोध केल्यावर फिर्यादीला चापटाबुक्यांनी मारहाण केली व हातातील चहाचा थर्मास हिसकावून त्यातील चहा फिर्यादीवर फेकल्याने त्याचा हात भाजला. याशिवाय आरोपीने थर्मास फोडून ५०० रुपयांचे नुकसानही केले. फिर्यादीची तक्रार मिळताच चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक राबविण्यात आले. तपासदरम्यान आरोपी गोरक्षणवाडी येथे लपल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करून त्याला जेरबंद केले. त्याच्याकडून लुटलेले १५०० रुपये व गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त करण्यात आला. बिझनीस हा अट्टल चोरटा असून याआधीही त्याच्यावर खूनाच्या प्रयत्नापासून ते दरोड्यापर्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहेत. त्याविरोधात २०१६ पासून २०२५ पर्यंत चार गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला बुलडाणा जिल्हा कारागृहात पाठविण्याचे आदेश दिले. ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक संग्राम पाटील यांच्या नेतृत्वात पोउपनि. समाधान वडणे, पोलीस अंमलदार राजेंद्र काळे, विकास देशमुख, संतोष जाधव, प्रशांत धंदर, पंढरी मिसाळ, अमोल गवई, निलेश सावळे व राहुल पायघन यांनी केली.

# अरे रे! ४ काळवीटाच्या शिकारीनंतर मांस विक्री!
## एक जिवंत काळवीट व मांस जप्त!
## शिकारी जाळ्यात फसलेच नाही!



जनसंचलन/ बुलढाणा


काळवीटाची शिकार करुन मांस विक्री करण्यात येत असल्याची माहिती बुलढाणा वनविभागाला मिळताच त्यांनी शेळगाव आटोळ ते अंचरवाडी शिवारात धाव घेतली.यावेळी रस्त्यावरील एका शेतात काळवीटाचे मांस विक्री सुरु असल्याचे निदर्शनास आले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना पाहताच शिकारी शेजारील मका पिकात फरार झाले. शिकारी जाळ्यात फसलेच नाही.ही कारवाई २४ ऑगस्ट रोजी करण्यात आली. घटनास्थळावरुन १ कापलेला व १ जिवंत काळवीट,१ मोटरसायकल ४ चामडे व शिकारीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. बुलढाणा वन परिक्षेत्रातील शेळगाव आटोळ ते अंचरवाडी रस्त्या जवळ एका शेताला लागून काळवीटाची शिकार करुन मांस विक्री करण्यात येत असल्याची गुप्त माहिती वन विभागाला मिळताच डीएफओ सरोज गवस, एसीएफ वैभव काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा आरएफओ सुनील वाकोडे यांनी वनपाल मोहसिन खान, वनरक्षक गजानन पोटे, समाधान झोटे वन मजूर प्रवीण सोनुने,पवन मुळे यांनी रवाना केले.घटनास्थळी काही जण काळवीटाची शिकार करुन मास विक्री करीत असल्याचे दिसून आले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना पाहताच शिकारी घटनास्थळावरून बाजूच्या मका पिकात फरार झाले.यावेळी कर्मऱ्यांनी पंचनामा करुन शिकारीसाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त केले. अज्ञात शिकाऱ्याविरुद्ध वन्य जीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा तपास सुरु असल्याची माहिती आरएफओ सुनील वाकोडे यांनी २४ ऑगस्टला रात्री ९ वाजेच्या सुमारास दिलीआहे.

# सोन साखळीचोरांची टोळी बुलढाण्यात सक्रिय!




जनसंचलन/बुलढाणा

सोन साखळीचोरांची टोळी बुलढाण्यात सक्रिय झाली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक अवैध धंद्यावर अंकुश कसत असले तरी, गुन्हेगारी कमी होत नसल्याचे चित्र आहे.काही वेळा पहिले धाड नाका परिसरातील राहणाऱ्या ब्रिजमोहन भडेच यांच्या आईच्या गळ्यातून दीड लाख रुपये किंमत असलेली सोन्याची पोथ अज्ञात आरोपींनी हिसकावून नेली. ही घटना आज काही वेळापूर्वी घडली. बुलढाणा जिल्ह्यात गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत आहे.खून, बलात्कार,दरोडा, चोरी, जबरदस्तीने महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पोबारा करण्याच्या घटना शहरात आहे. शहरातील वावरे लेआउट येथे सुद्धा अनेक घटना घडल्या.मात्र पोलीस तपास शुन्यआहे




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८